**स्थायी निदेश क्र.३-(अ)**

जिल्हाधिकारी आणि विभागीय स्तरावरील बैठकीमध्ये राज्यातील नगरपरिषदांचे कामकाज नियंत्रणासाठी २० कलमी कार्यक्रम विहित करण्याबाबत.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
क्र:नप्रसं /नगरपरिषद नियंत्रण/२००५/प्र.क्र. ३७३ / ३२
दिनांक :११ मे, २००५

**वाचाः** १) या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.३ क्रमांक संकीर्ण २०००/प्र.क्र.२४/२०००/८ दि. १५.८.२०००
२) या संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण २०००/प्र.क्र.२४/२०००/८ दिनांक १.१.२००१

**प्रस्तावना**

सन २००१ ची जनगणनेनुसार राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ४२.४० टक्के लोकसंख्या नागरी भागातील आहे. राज्याचा नागरीकरणाचा वेग विचारात घेता पुढील दहा वर्षात हे प्रमाण ५० टक्केपर्यंत होईल यामध्ये दुमत नाही. ७४ वी घटना दुरुस्ती यामुळे नगरपरिषदांच्या कर्तव्य व जबाबदारीमध्ये वाढ झालेली आहे. नागरीकांना पुरविण्यांत येणा-या सेवा व सुविधा यांचा दर्जा चांगला रहावा तसेच यावरील होणारा खर्च भागविण्यासाठी कर वसुलीची टक्केवारी चांगली रहावी. वित्तीय शिस्त व व्यवस्थापनाच्या दर्जामध्ये सुधारणा व्हावी, विकासाचे प्रकल्प कामे यांची गती वाढावी नगरपरिषदेच्या कारभार पारदर्शक व लोकाभिमुख रहावा, नगरपरिषदेच्या कामकाजातील गैरप्रकारांना आळा बसून कामकाजात सुधारणा करावी इ. उद्दीष्टे साध्य करण्यासाठी नगरपरिषदांसाठी कार्यक्रम विहित करणेची बाब विचाराधीन होती.

**आ दे श**

०२. राज्यातील नगरपरिषदांचे कामकाज अधिक गतीमान करण्यासाठी व त्यावरील नियंत्रणासाठी खालीलप्रमाणे २० कलमी कार्यक्रम विहित करण्यात येत आहे. मुद्या क्र. १ ते ७ हा वित्तीय शिस्त व आर्थिक स्थिती बळकट करण्याबाबतचा आहे. मुद्या क्र. ८ व ९ हा नगरपरिषदेच्या कामकाजात शिस्त व पारदर्शकता या संबंधीचा आहे. मुद्या क्र. १० ते १४ हा नागरीकांना पुरविण्यांत येणाऱ्या सेवा, सुविधा व दर्जा सुधारणे तसेच विकासाच्या संबंधित आहे. मुद्या क्र. १५ ते १८ हा शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी यासंबंधिचा आहे. आणि मुद्या क्र. १९ व २० हा नगरपरिषदेच्या वैशिष्टयपूर्ण कार्यासंबंधिचा आहे.

१. आर्थिक स्थिती
२. अहवालाच्या वर्षातील स्वत:चे उत्पन्न: मालकत्ता कर
३. नगरपरिषद वाणिज्य कर पासूनचे उत्पन्न
४. नगरपरिषद मालमत्ता यांच्यापासून मिळालेल्या महसूलाचे उत्पन्न
५. खाजगी जागेवरील विकास कामासाठी वसूली
६. उपयोगिता सेवा आणि संकिर्ण बाबींपासूनचे उत्पन्न
७. पाणीपट्टी
८. आस्थापना व भांडवली खर्च
९. कार्यालय व्यवस्थापन

१०. अनुदान विनियोग

११. शहर विकास

१२. रस्ते, फुटपाथ, समाज केंद्र, पे ॲन्ड पार्क सुविधा. सार्वजनिक स्वच्छता, सुंदर व प्रदुषणमुक्त शहर यासाठी प्रयत्न

१३. अतिक्रमणाविरुध्द केलेली कार्यवाही

१४. आरोग्य / शिक्षण

१५. घनकचरा निर्मुलन

१६. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना उद्दीष्टांची पुर्तता

१७. प्रशासकीय सुधारणा - लोकाभिमुख प्रशासन

१८. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानाबाबत

१९. मा.जिल्हाधिकारी यांनी नेमून दिलेल्या विशेष कामाबाबतची माहिती.

२०. वर्षभरात मुख्याधिकारी यांनी स्वत: निवडलेल्या इतर उल्लेखनिय अशी महत्वाची व वैशिष्टयपूर्ण कामे

०३. विभागीय व जिल्हा पातळीवर आयोजित करण्यांत येणाऱ्या नगरपरिषदेच्या कामकाजाच्या आढावा बैठकीसाठी या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.३ क्रमांक संकीर्ण २०००/प्र.क्र.२४/२०००/८, दि. १५.८.२००० अन्वये प्रपत्रे विहित करण्यांत आली होती. नगरपरिषदांकडून विविध मुद्यांवर सादर करण्यांत येत असलेल्या माहितीमध्ये अचूकता रहावी. नगरपरिषदेच्या कामकाजाचे उचित मूल्यमापन व्हावे आढावा बैठकीमध्ये देण्यांत येणाऱ्या निदेशामध्ये एकसुत्रता राहावी म्हणून वरील २० कलमी कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुधारीत प्रपत्रे सोबत जोडून पाठविण्यांत येत आहेत. **(प्रपत्र सोबत समाविष्ट केलेले नाहीत)**

०४. या संचालनालयाचे परिपत्रक क्र. सीओडी २००४/प्र.क्र.७/०४/१, दि. १२ मार्च, २००४ अन्वये मुख्याधिकारी, जिल्हा प्रकल्प अधिकारी आणि सहाय्यक प्रादेशिक संचालक यांचे कामकाजाचे मूल्यमापन होण्यासाठी प्रपत्रे विहित करण्यांत आलेली आहेत. गोपनीय अहवालासोबत सादर करण्यांत येणाऱ्या मूल्यमापन अहवालामध्ये व आढावा बैठकीतील विहित केलेल्या प्रपत्र यामध्ये समानता राहिल्यास मुख्याधिकाऱ्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन योग्य रितीने व्हावे यासाठी आढावा बैठकीची प्रपत्रे आणि स्वयंमूल्यमापन अहवलातील मुद्दे यामध्ये समानता ठेवण्यांत आली आहे.

०५. विभागीय व जिल्हा स्तरावरील प्रत्येक बैठकीसाठी नगरपरिषदेची माहिती सोबतच्या प्रपत्रात मुख्याधिकारी यांनी सादर करावयाची दक्षता घ्यावयाची आहे. बैठकीसाठी सादर करावयाची माहिती तसेच नगरपरिषद तपासणी किंवा अन्य वेळी सादर करण्यांत येणारी माहिती यामध्ये तफावत राहणार नाही याची दक्षता मुख्याधिकारी यांनी घ्यावयाची अहे. सदरची माहिती ही दर तिमाहीसाठी सादर करण्याची दक्षता घ्यावयाची असून त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यांत येत आहेत.

तिमाही

१) एप्रिल ते जून

२) जुलै ते सप्टेंबर

३) ऑक्टोबर ते डिसेंबर

४) जानेवारी ते मार्च

०६. एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी महिन्याचे ५ तारखेपर्यंत, संबंधित नगरपरिषदेचा त्या मागील तिमाहीचा अहवाल नगरपरिषदेने जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे. जिल्हाधिकारी कार्यालयाने १० तारखेपर्यंत आयुक्त व प्रादेशिक संचालक यांचे कार्यालयाकडे ही माहिती संकलित करुन सादर करणे. आयुक्त व प्रादेशिक संचालक यांनी १५ तारखेपर्यंत संपूर्ण विभागातील माहितीचे संकलन करुन सभेसाठी तयार ठेवणे तसेच त्याची आगावू प्रत नगरपालिका प्रशासन संचालनालयास पाठविणे आवश्यक राहील. प्रत्येक तिमाहीतील कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठका या त्या पुढील म्हणजेच एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्याच्या तिस-या व चौथ्या आठवडयात प्रादेशिक संचालक, कार्यालयात घेण्यांत येतील. आढावा बैठकीसाठी लागणारी संकलित माहिती तयार ठेवण्याची जबाबदारी प्रादेशिक संचालक यांचे कार्यालयाची राहील. वरीलप्रमाणे घेतल्या जाणा-या आढावा बैठकीध्ये काही वेळा संचालक यांना स्वत: उपस्थित राहणे शक्य नसल्यास प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन हे बैठका घेतील.

०७. या संचालनालयाचे परिपत्रक क्र. सीओडी २००४/प्रक्र.७/०४/१ दिनांक ३.५.२००५ अन्वये संवर्ग नगरपरिषद मुख्याधिकारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे / पुर्नविलोकित करणेसाठी कार्यपध्दत विहित करणे / गोपनीय अहवाल लिहितांना त्यांच्या कार्यविषयक बाबी विचारात घेणेसाठी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

०८. वरील स्थाई निदेशाचे वाचन नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत करण्यांत येऊन तशी नोंद कार्यवृत्तांतात घेण्यांत यावी.

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

**स्थायी निदेश क्र.३-(ब)**

**जिल्हाधिकारी आणि विभागीय स्तरावरील बैठकीमध्ये राज्यातील नगरपरिषदांचे कामकाज नियंत्रणासाठी २० कलमी कार्यक्रम विहित करण्याबाबत.**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
क्र: नप्रसं /नगरपरिषद नियंत्रण/२००५/प्र.क्र. ३७३ / ३२
दिनांक : २५ ऑक्टोबर, २००५

वाचाः १) या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.नप्रसं/नगरपरिषद नियंत्रण/२००५/प्र.क्र.३७३/३२ दि. ११.५.२००५

प्रस्तावना

राज्यातील नगरपरिषदांचे कामकाज अधिक गतिमान करण्यासाठी व त्यावरील नियंत्रणासाठी या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.नप्रसं/नगरपरिषद नियंत्रण/२००५/प्र.क्र.३७३/३२ दिनांक ११.५.२००५ नगरपरिषदांसाठी २० कलमी कार्यक्रम विहित करण्यांत आला होता. या अंतर्गत विहित केलेल्या प्रपत्रामध्ये माहिती भरतांना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

०२. या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र. नप्रसं/नगरपरिषद नियंत्रण/२००५/प्र.क्र.३७३/३२ दिनांक ११.५.२००५ मधील नगरपरिषदांसाठी २० कलमी कार्यक्रम अंतर्गत विहित केलेल्या प्रपत्रामध्ये माहिती भरतांना मुख्याधिकारी यांनी खालील सूचनांचे पालन करावे.

अ) मुद्या क्र.१ : वित्तीय शिस्त -

१. अहवालाचे तिमाहितील उत्पन्न/खर्च हे फक्त नगरपरिषदेचे स्वत:चे उत्पन्न (शासनाकडून प्राप्त अनुदानासह) नमूद करावे.

२. रकाना ४ मध्ये खालील सूत्राचा वापर करावा.

एकूण दायित्वाशी सरासरी उत्पन्नाची टक्केवारी (३-ह) / (२-अ) x १००

३. रकाना ५ मध्ये फक्त नगरपरिषदेचे स्वत:चे फंडातून मंजूर करण्यांत आलेली कामे/ पुरवठा आदेशान्वये होणारा अपेक्षित खर्च दर्शवावा.

ब) मुद्या क्र. १७ (ब) : निविदा पध्दत

रकाना क्र.५ मध्ये ४ उप रकाना (चालू कामे, कामाचे प्रत्येक ठिकाणी फलक लावले काय, देयके फक्त एक खिडकी योजनेद्धारे स्विकारली जातात काय, जेष्ठतेप्रमाणे देयके अदा केली आहेत काय, थकीत देयकांची यादी, नगरपरिषद सभागृहाला दिली / नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली काय) अंतर्भूत करावे.

क) मुद्या क्र. १७ (क) : माहितीचा अधिकार

रकाना क्र. ४ विलंब प्रकरणी दंडनीय कार्यवाही याऐवजी एक खिडकी योजना (दाखले व सेवा यांची संख्या, अहवाल कालावधीतील एकूण प्राप्त अर्ज, नागरीकांच्या सनदेप्रमाणे किती अर्ज प्राप्त झाले व निकाली काढले याची कार्यवाही याबाबतची माहिती नमूद करण्यांत यावी.

०३. वरील मुद्या क्र.१ : वित्तीय शिस्त, मुद्या क्र. १७(ब) : निविदा पध्दत आणि मुद्या क्र. १७(क): माहितीचा अधिकार बाबतचे सुधारीत प्रपत्र सोबत जोडले आहे. याचा वापर २० कलमी कार्यक्रमांतर्गत माहिती भरतांना करण्यांत यावा. **(प्रपत्र सोबत समाविष्ट केलेले नाहीत)**

०४. विभागीय आणि जिल्हा स्तरावरील बैठकीमध्ये राज्यातील नगरपरिषदांचे २० कलमी कार्यक्रमा अंतर्गत कामकाजाचा आढावा घेतला असता विहित प्रपत्रामध्ये माहिती भरतांना नगरपरिषदांनी चुकीची माहिती भरली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे यापुढील प्रपत्रातील माहिती पाठवितांना नगरपरिषदेने मुख्याधिकारी व लेखापाल यांनी माहिती सोबत खालीलप्रमाणे दाखला जोडून माहिती पाठविण्याची दक्षता घ्यावी.

``प्रमाणित करण्यांत येते की, नगरपरिषदांचे २० कलमी कार्यक्रमा अंतर्गत विहित प्रपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले आहे. उत्पन्न व खर्चाची माहिती नगरपरिषदेच्या सन २००५-०६ या वित्तीय वर्षाचे लेख्याप्रमाणे (Account) आहे . ``

०५. जिल्हा प्रकल्प अधिकारी व सहाय्यक प्रादेशिक संचालक यांनी नगरपरिषदेकडून प्राप्त झालेली माहिती ही नगरपरिषदांच्या अंदाजपत्रकातील माहितीशी तुलना करुन त्याची छाननी करावी व ती चुकीची आढळल्यास याची गंभीर दखल घेऊन संबंधित मुख्याधिकारी व लेखापाल यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

०६. वरील स्थाई निदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति :

१) मुख्याधिकारी , नगरपरिषदा (सर्व)

२) जिल्हाधिकारी (सर्व)